## *प्रकल्प धोरण*

अशासकीय सेवाभावी संस्था अनेक अडचणीतून वाट काढीत आपल्या ध्येयाप्रती कटिबद्ध असतात. सेवाभावी संस्थांना भेडसावणाऱ्या अनेक समस्यांपैकी बहुदा सर्वात मोठी आणि सर्वसामान्य समस्या असते ती निधी मिळविण्याची. या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचा एकमेव राजमार्ग म्हणजे स्वत:ची योग्यता आणि पात्रता सिद्ध करणे. आणि ते साधण्यासाठी सर्वप्रथम गरज आहे ती आपल्या कार्यक्रम / उपक्रमांमध्ये व्यावसायिकता आणण्याची. व्यावसायिकता म्हणजे बाजारूपणा नव्हे, तर व्यावसायिकता म्हणजे अंगिकारलेल्या कार्याचे उद्देश, नियोजन आणि परिणाम यांची विनासबब संपूर्ण जबाबदारी स्वीकारण्याची मानसिकता. अशा प्रकारची मानसिकता विकसित करण्याचा राजमार्ग म्हणजे संस्थेच्या कार्यक्रमांचे प्रकल्पीकरण!

कुठल्याही कामाचे प्रकल्पात रुपांतर केले की प्रकल्प व्यवस्थापनाचे सर्व निकष व साधने त्यास लागू होऊन, उद्दिष्टे निश्चिती, प्रगतीचे टप्पे, प्रगती दर्शक, प्रकल्प अहवाल इत्यादी प्रक्रिया क्रमप्राप्त होतात. त्यामुळे आपोआपच अंगीकृत कार्याचे काळ-काम-वेग याचे गणित त्याच्या आर्थिक नियोजनासह मांडणे आवश्यक होते. तथापि प्रकल्प पद्धतीने काम करण्याठी आवश्यक असते ती प्रकल्प-केन्द्री कार्यसंस्कृती आणि अशी संस्कृती विकसित होण्यासाठी लागते ते प्रकल्प धोरण. प्रत्येक संस्थेचे स्वत:चे स्वतंत्र व उद्दिष्टानुरूप प्रकल्प धोरण असणे केवळ अपेक्षितच नव्हे तर अनिवार्य असायला हवे. कारण प्रकल्प धोरण हे केवळ संस्थेच्या कार्यास दिशादर्शक म्हणूनच नव्हे तर संस्थेच्या विकासाचा दीपस्तंभ म्हणून कामास येते. अशा प्रकल्प धोरणात खालील बाबींचा अंतर्भाव जरूर असावा –

१. प्रकल्प निवडीचे निकष – संस्थेची ध्येय-धोरणे व उद्दिष्टे यांना अनुरूप प्रकल्प निवडणे
२. प्रकल्प राबविण्याची पद्धती – प्रकल्पाचे छोटया छोटया टप्प्यात विभाजन व कार्य विभागणी
३. प्रकल्प प्रगतीचे दर्शक – प्रकल्प योग्य दिशेने व गतीने चालू असल्याचे निदर्शक निश्चिती
४. प्रकल्प अहवालाचे प्रारूप – प्रकल्प पूर्व, प्रकल्प कार्यान्वित व प्रकल्प पश्चात अहवालाची प्रारूपे
५. प्रकल्प उद्दिष्टे व्यवस्थापन – प्रकल्पाच्या प्रस्तावित उद्दिष्टांचे प्रभावी व्यवस्थापनासाठी यंत्रणा
६. प्रकल्प काळ व्यवस्थापन – प्रकल्पाच्या प्रस्तावित अवधीच्या व्यवस्थापनासाठी यंत्रणा
७. प्रकल्प मूल्य व्यवस्थापन – प्रकल्पाच्या प्रस्तावित मूल्यासाठी प्रभावी व्यवस्थापनासाठी यंत्रणा
८. प्रकल्प दर्जा व्यवस्थापन – प्रकल्पाच्या प्रस्तावित दर्जासाठी प्रभावी व्यवस्थापनासाठी यंत्रणा
९. प्रकल्प प्रलेखनाचे प्रारूप – प्रकल्पाच्या प्रलेखानासाठी आवश्यक व समर्पक व्यवस्था
१०. प्रकल्प विश्लेषण व निष्कर्ष – प्रकल्प पूर्ण झाल्यावर घ्यावयाच्या नोंदी व तात्पर्य

प्रकल्प धोरण निश्चिती ही केवळ प्रकल्पाच्या यशस्वी पूर्ततेसाठी गरजेची आहे असे नव्हे तर त्यायोगे विनासायास एक संस्था रचना चित्र तयार होवून रचानात्मक कार्यसंस्कृती वाढण्यास मदत होईल.

626, Narayan Peth, Near Lokhande Talim, Pune – 30
Telephone: +91-20-24473271 Fax: +91-20-24465012
Mob: 9823021823 Email: manishp@rmponweb.org


© Manish Puranik I Jan 2017

## कार्यसंस्कृती

संस्थात्मक रचनेमध्ये कुठलेही काम हे वैयक्तिक नसून समूहभावनेने करावयाचे कर्तव्य असते. एका मोठ्या उद्दिष्टासाठी अनेक छोटया छोटया टप्प्यांवर आपापले यथोचित योगदान दिल्याशिवाय मोठे उद्दिष्ट साध्य होऊ शकत नाही याची जाण व भान सर्व कार्यकर्त्यांना असणे आवश्यक ठरते. घड्याळाच्या गुंतागुंतीच्या रचनेतील प्रत्येक घटक गतिमान असल्याशिवाय योग्य वेळ दाखविणे घड्याळाला शक्य होणार नाही, तद्वतच, प्रत्येक कार्यकर्त्याने स्वेच्छेने स्वीकारलेले किंवा नेमून दिलेले कार्य यथार्थ पद्धतीने पार पाडण्यात हलगर्जीपणा केल्यास कार्यक्रमाच्या एकूण परिणामावर त्याचा विपरीत परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाही. तथापि आपले संस्थेप्रतीचे कर्तव्य यथास्थित पार पाडण्यास कार्यकर्त्यास ज्या गुणवैशिष्ट्यांची गरज भासते त्यात कार्यानुरूप ज्ञान, कौशल्ये व क्षमता यांच्याबरोबरीने आत्यंतिक निकडीची गोष्ट म्हणजे कार्यसंस्कृती!

कार्यसंस्कृतीचा साधा सोपा अर्थ म्हणजे संस्थेच्या दैनंदिन कामकाजातील संस्थेची एकत्रित भूमिका व पद्धती. गुरुत्वाकर्षणाच्या नियमाप्रमाणे, वागण्याच्या पद्धती व कामकाजाच्या सवयी या वरून खाली झिरपत जातात. ज्या संस्थेतील पदाधिकारी आपल्या कामात आनंद घेऊन त्याचा अभिमान बाळगत नाहीत किंवा आपल्या कार्यकर्त्यांना सहकाऱ्याच्या भूमिकेतून वागवत नाही त्या संस्थेचे कार्यकर्ते समरसून काम करण्याची आणि इतरांना प्रेमादरपूर्वक वागवण्याची शक्यता विरळाच. लहान मूल जसे अजाणतेपणी आपल्या पालकांच्या वागण्या-बोलण्याची नक्कल करून त्यांच्याप्रमाणेच वागा-बोलायला लागते तसेच, संस्थेतील सगळेच पदाधिकारी व कार्यकर्ते आपल्या वरिष्ठांच्या सवयी व लकबी उचलून नेणीवेतून तशीच कार्य व वर्तन पद्धती अवलंबीतात. 'बोले तैसा चाले' आणि 'आधी केले मग सांगितले' ही केवळ भिंतींची शोभा वाढवणारी बोधवचने न राहता स्वत:च्या वर्तणुकीतून सोदाहरण सिद्ध केल्यास, कार्यकर्त्यांना योग्य तो संदेश जातो व त्यांना वेगळे प्रशिक्षण, समुपदेशन किंवा कार्यशाळा यांची गरज भासत नाही.

हे साध्य करण्याचा देखील सगळ्यात सोपा व प्रभावी उपाय प्रकल्प धोरण व प्रकल्प व्यवस्थापन यात सापडतो. प्रकल्पाला निर्धारित उद्दिष्टे, नियोजित कार्यकाल व समाधानकारक प्रगतीचे मापदंड असल्याने व अहवालासाठी प्रकल्पच्या सर्व अवस्थांचे तपशीलवार प्रलेखन ही प्रकल्प यशस्वीतेची पूर्वअट असल्याने, आपोआपच कामांची विभागणी, दैनंदिन प्रगतीचा आढावा व त्यायोगे करावा लागणारा संवाद यातून प्रकल्पाच्या सर्व सहभागींना समूहभावनेने काम करणे आवश्यक ठरते व किमान आपल्या योगदानाचे चीज व्हावे यासाठी झटणारे घटक परिणामी समग्र प्रकल्प नियोजनपूर्वक यशस्वी करण्यात मोलाचा वाटा उचलतात. प्रकल्पाच्या यशामध्ये आपले यश पाहण्याची वृत्ती वाढीस लागली की प्रकल्प यशस्वितेचे प्रमाण विनासायास वाढते व यशस्वी प्रकल्पांची वाढती संख्या संस्थेच्या प्रतिमा संवर्धनास लाभदायी ठरून संस्थेस निधी मिळणे सोपे होते व संस्थेची आणि परिणामी संस्थेच्या कार्यकर्त्यांची स्पर्धेत टिकून रहाण्याची क्षमता वाढीस लागते.

प्रकल्प धोरण व कार्यसंस्कृतीचा परस्परसंबंध असा मुळापासून जाणून घेतल्यास संस्थेच्या विकासातील प्रकल्प व्यवस्थापनाची महती सहज लक्षात यावी.

626, Narayan Peth, Near Lokhande Talim, Pune – 30
Telephone: +91-20-24473271 Fax: +91-20-24465012
Mob: 9823021823 Email: manishp@rmponweb.org


© Manish Puranik I Jan 2017